विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०
सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर
CNR-MHJNO20000171990

## निशाणी क्र.२४२ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जात वादींनी कथन केले आहे की, प्रस्तुतच्या प्रकरणात तत्कालीन दिवाणी न्यायाधीश व.स्तर, यांनी पारीत केलेला निशाणी क्र.२११ वरील आदेशाविरुध्द प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते ते मंजुर झाले. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द वादींनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेला पुर्नविचार अर्ज फेटाळण्यात आला. त्या आदेशाविरुध्द वादींनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला अर्ज नामंजुर करण्यात आला. त्यानंतर वादींतर्फे दिनांक १३.१०.२०२० रोजी वादीचे साक्षीचे शपथपत्र दाखल करण्यात आले होते. त्यावेळेस प्रतिवादींच्या वकिलांनी सदर शपथपत्रातील मजकुरामध्ये अतिरिक्त मजकुर असल्याबाबत आक्षेप घेवून सदर अतिरिक्त मजकुर वगळण्याबाबत वादींना आदेशित करावे अशी तोंडी हरकत घेतली होती. वादींनी दाखल केलेल्या साक्षीचे शपथपत्रबाबत प्रतिवादींच्या विधीज्ञांनी घेतलेली तोंडी हरकत विचारात घेवू नये अशा आशयाची विनंतीसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

२) प्रतिवादींतर्फे प्रस्तुतच्या अर्जाला म्हणणे देण्यात आले की, वादीने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुरुस्ती करणे आवश्यक असतानाही आजातागायत केलेली नाही. वादींनी निशाणी क्र.२११ बाबतच्या निर्देशानुसार निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्ती करणे अपेक्षित असताना त्यांनी सदरचा मजकूर वगळण्याऐवजी कायम ठेवला आहे. तसेच, साक्षीच्या शपथपत्रामध्येही मुळ दावा व शपथपत्रातील मजकुरामध्ये तफावत दिसून येते जे न्यायतत्वाला धरुन नाही. सदर दुरुस्ती संदर्भातील कथनांच्या तफावतीबाबत न्यायालयाने वादींस सदर शपथपत्र दाखल करुन घेतानाच निर्देश दिले होते परंतु त्याची अंमलबजावणी करण्याऐवजी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात मा. उच्च न्यायालयानी कार्यमर्यादा ठरवून दिलेली आहे असे असतानाही

वादींतर्फे वारंवार उलट सुलट कार्यवाही करत असल्याने अर्ज रु.२०००/- खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

३) दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादींतर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय **Harakchand Gulabchand Dhoka V/s Kashinath Narsingh Marathe 2010 All MR (Supp.) 625** चा दाखला देण्यात आला. मा. मुंबई उच्च न्यायालयाने सदर न्यायनिर्णयामध्ये नमुद केले आहे की, partly raising objection to any part of affidavit in lieu of examination-in-chief, cannot insist upon Court to consider the said objection before the cross-examination of the witness. If a portion of the affidavit is found to be irrelevant has no foundation in pleadings, Court can always discard it while deciding suit. However, Court has no power to delete any portion of such affidavit. सदरहु न्यानिर्णयाचे मी विन्रमपणे अवलोकन करुन त्यातील कायदेशीर तत्व विचारात घेतले. कायद्याच्या प्रस्थापित तत्वानुसार साक्षीच्या शपथपत्रामध्ये मुळ दाव्यातील कथना व्यतिरिक्त अतिरक्त कथन आल्यास सदर अतिरीक्त कथन 'struck out' करता येत नाही. सदर अतिरिक्त कथनाबाबंत प्रतिपक्षास उलटतपास घेण्याचा अधिकार आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणात वादींचे शपथपत्रात आलेला कथित अतिरिक्त मजकूराबाबत उलटतपास घेण्याची संधी प्रतिपक्षास असल्याने त्या बाबींचा विचार येथे करता येणार नाही.

४) प्रस्तुतच्या प्रकरणात अभिलेखाची पडताळणी केल असता, निशाणी क्र.२११ विरुध्द प्रतिवादींनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.२४१२/२००५ मधील मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार वादींनी निशाणी क्र.२११ अन्वये दाव्यात केलेली दुरुस्ती रद्द करण्यात आली. त्याचप्रमाणे सदर रिट पिटीशनमधील आदेश पारीत करताना मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या प्रकरणात कालमर्यादा ठरवून दिली आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाचे सदरहू आदेश व प्रस्तुतच्या प्रकरणातील “R & P” या निर्णयास प्राप्त झाल्यानंतर पुढील सुनावणी सुरु करताना वादींनी सदर आदेशाची पुर्तता करणे आवश्यक असून त्यानंतरच पुढील कार्यवाही सुरु

करणे योग्य व संयुक्तीक ठरेल असे आढळल्याने त्याबाबत वादींस न्यायालयाने तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु, त्याचवेळेस वादींतर्फे साक्षीचे शपथपत्र दाखल करण्यता आले ज्यामध्ये सदरहू आदेशाची पुर्तता न झाल्याने सुधारीत दाव्यात असलेले अतिरिक्त कथनही शपथपत्रात आले असल्याबाबत प्रतिवादींच्या वकिलांनी न्यायालयासमक्ष कथन केले. सदर आदेशाची अंमलबजावणी दाव्यामध्ये करणे आवश्यक असल्याने वादीस त्याबाबत तोंडी सूचना देण्यात आल्या त्यावेळेस साक्षीच्या शपथपत्राबाबत कोणताही लेखी आदेश न्यायालयाकडून पारीत झालेला नाही. तसेच, प्रतिवादींकडूनही वादींच्या साक्षीच्या शपथपत्रातील अतिरिक्त मजकुराबाबत कोणताही लेखी आक्षेप अर्ज अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे एकंदरीत परिस्थिती पाहता वादींतर्फे मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशाप्रमाणे मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची अंमलबजावणी करण्यापेक्षा सदर शपथपत्राच्या बाबींबाबत नंतर लेखी अर्ज देण्यात आला. यावरुन मुळ मुद्या बाजुलाच ठेवून इतर बाबींकडे लक्ष वेधूल्याची वृत्ती दिसत आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे अतिशय जुने प्रकरण असून त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने कालमर्यादा ठरवून दिलेली असूनही तांत्रीक बाजु पुढे करुन प्रकरण पुढे ढकलण्यात येत असल्याचे दिसुन येते. त्यामुळ प्रस्तुतचा अर्ज हा तथ्यहीन असल्याने खर्चासह फेटाळण्यात येतो.

**आदेश**

१) अर्ज रु.३००/– खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

२) प्रकरण कालबध्द असल्याने सुनावणी तत्परतेने करण्याबाबत दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांनी दक्षता द्यावी.

Digitally signed by Madhuri Sudhakar Kulkarni
Date: 2021.01.25 14:09:51 +0530

**(एम. एस. कुलकर्णी)**

दिनांक २२.०१.२०२१

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),

जालना

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व. स्तर), जालना

दिनांक : २५.०१.२०२१

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक (नि. श्रे.)